
# चैतन्य सुमने

अंक ०२ | दत्तजयंती २६ डिसेंबर २०२३




चैतन्य सुमने या नियतकालिकाचा दुसरा अंक प्रसिद्ध करताना आनंद होत आहे भक्तांची शब्द सुमने श्रींच्या चरणाशी वाहण्याची भावना लक्षात घेऊन संस्थानतर्फे एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या कल्पनेने हे नियतकालिक प्रसिद्ध करण्यात येत आहे. प्रसिद्ध झालेले अनुभव वा माहिती याचे संस्थानतर्फे त्याचे कोणत्याही प्रकारे प्रमाणीकरण व उदात्तीकरण करण्याचा हेतू नाही. केवळ अंत:करणपूर्वक केलेली साधना वा प्रार्थना यांना त्यांच्याकडून प्रतिसाद मिळतो व त्यांचा कल्याणमयी हात आपल्या प्रपंचात अनुभवास येतो हे समजण्यास व त्यामुळे आपल्या श्रद्धेस बळकटी येण्यास मदत होईल. हे प्रसिद्ध करण्यामागची हीच भावना आहे. यापुढेही आपले लेख वा अनुभव chaitanya.smaran23@gmail.com या ईमेल वर 'चैतन्य सुमने साठी' अशी नोंद करून पाठवाव्या. श्रीमहाराजांच्या ११० व्या पुण्यतिथी उत्सवाच्या निमित्ताने ही चैतन्य सुमने श्रींच्या चरणी अर्पण!

**– आपले विश्वस्त मंडळ, चैतन्योपासना**

---



# माझ्या जीवनात मी काय शिकलो ?

## – के. वि. बेलसरे

(पू. बाबा बेलसरे यांनी त्यांच्या शेवटच्या काही दिवसात व्यक्त केलेले मनोगत. प्रत्येक साधकाला नव्हे प्रत्येक व्यक्तीला मार्गदर्शक.)

आणखी चार महिन्यांनी मी नव्वदाव्या वर्षात पदार्पण करणार आहे. मला माझ्या चवथ्या वर्षांपासून स्पष्ट स्मृती आहे. मी या पंचाऐंशी वर्षात जे शिकलो ते प्रत्येकाला उपयोगी पडेल म्हणून सांगतो.

१. आपल्या जीवनाला जसा आरंभ होतो तसा त्याचा शेवट कधीच होत नाही कारण सगळंच कल्पनेबाहेर बदलतं. परिस्थिती पण बदलते, माणसं बदलतात, घटना बदलतात, इतकंच नव्हे तर आपले शरीर आणि मन देखील बदलून जाते.

२. जीवन म्हणजे एक गूढ प्रवास आहे. आपण कोठून या जगात आलो, कोणी पाठवले हे आपल्याला कळत नाही. तसेच हे जग कशा परिस्थितीत सोडायचे, कोठे सोडायचं, कशा अवस्थेत सोडायचे हे आपल्याला ठाऊक नाही बरे! जग सोडल्यावर आपण कोठे जातो, आपल्याला कोण भेटतात, त्यांच्या सहवासात किती काळ रहायचे हे आपल्याला माहित नाही. एकूण, जीवनाचा आरंभ अज्ञानात होऊन त्याचा अंत देखील अज्ञानात घडून येतो.

३. आपण आपल्या इच्छा तृप्त करण्याचा जन्मभर सतत प्रयत्न करतो परंतु ते घडवून आणण्याची शक्ती आपल्या अंगी नसते. पुढे जे घडून यावे असे वाटते त्याची उपाय रचना आपण सतत करतो, पण आपले दृश्यावर, म्हणजे समकालीन माणसांच्यावर आणि घटनांवर अवलंबून असतात. त्यामुळे प्रत्यक्षात जे घडून येते ते आपल्या मनाच्या उलट किंवा मनासारखे घडलेच तरी त्याने मनाचे समाधान होत नाही.

४. यावरुन मी असे शिकलो की मानवी जीवन माणसाने ठरविलेल्या सिध्दांताप्रमाणे चालत नाही, ते आगगाडीच्या रुळाप्रमाणे ठरलेले नाही. ते एखाद्या समुद्राकडे धावणाऱ्या





नदीसारखे आहे. कोणाच्या वाटयास काय प्रसंग येईल कोणास सांगता येत नाही.

५. आपल्या मनासारखे व्हावे असे तर वाटते आणि तसे घडेल याची खात्रीही नसते म्हणून प्रत्यक्ष जीवन जगतांना मनाला एक प्रकारची अस्वस्थता, काळजी, भीति आणि असुरक्षितता व्यापून राहतात त्यातून मोकळे होण्यास अज्ञाताची कांस धरल्यावाचून गत्यंतर उरत नाही. अज्ञात दोन प्रकारचे आहे:
एक– विश्वाला चालवणारी प्रचंड शक्ती आणि
दोन– ती शक्ती ज्या व्यक्तीमध्ये प्रत्यक्ष अवतरते त्याचा सहवास.

६. विश्व चालावणाऱ्या अज्ञात शक्तीला "नियती" असे म्हणतात. नियतीलाच संत "प्रारब्ध" असे म्हणतात. नियतीवर पूर्ण श्रध्दा ठेऊन जीवन जगणे सामान्य माणसाला फार कठीण जाते. नियती आपल्या जीवनात कोणत्या वेळी काय उलटापालट करील याचा अंदाज कोणालाच करता येत नाही.

७. म्हणून, ज्या व्यक्तीमध्ये विश्वशक्ती साकार होते अशा सद्गुरुला मनाने घट्ट धरणे हा जीवनातील काळजी, भीति व असुरक्षितता नाहीसा करण्याचा रामबाण उपाय आहे. हे मी जीवनात अत्यंत स्पष्टपणे शिकलो.

८. संताला मनाने घट्ट धरणे म्हणजे त्याला आपल्या जीवनात सर्वात महत्वाचे स्थान दयायचे. मी शरीराने व्यवहारांत वागत असतांना "मी त्याचा आहे" म्हणून त्याचे सतत स्मरण बाळगणे ही संतांचे झाल्याची खरी खूण आहे. आपल्याला अज्ञाताची इच्छा काय आहे हे कळत नाही म्हणून आपल्या इच्छेमध्ये व त्याच्या इच्छेमध्ये संघर्ष येतो. तो नाहीसा व्हावा यासाठी आपण आपली इच्छा त्याच्या इच्छेत विलीन करण्याचा अभ्यास करावा. या अभ्यासालाच 'नामस्मरण' असे संत म्हणतात. म्हणून नामस्मरणाने माणसाचे जीवन अज्ञाताच्या सत्तेने भरुन एकदा ते भरले की मग कोणत्याही परिस्थितीत जाते. माणसाचे समाधान भंगत नाही असा अनुभव येतो.



**यासाठी माझ्या या शेवटच्या दिवसांत मी सगळे सोडून नामस्मरण करतो.**

के. वि. बेलसरे, १४ सप्टेंबर १९९७



# दत्तजयंतीच्या निमित्ताने

श्रीमहाराज म्हणाले – "दत्ताला अवधूत म्हणतात. अवधूत म्हणजे विरक्त, म्हणजेच विषयांचे, प्रपंचाचे प्रेम नसलेला. दत्ताचा अवतार साधकांसाठी झाला. रामाचा अवतार कर्तव्य कसे करावे हे दाखवण्यासाठी आहे. कृष्णाचा अवतार जीवन प्रेमाने कसे भरावे यासाठी आहे. दत्ताचा अवतार साधकाने विरक्तीने श्रीमंत कसे व्हावे हे शिकवण्यासाठी आहे.

भगवंत सर्वत्र आहे व तो गुणरूपाने आहे. ते गुण शिकण्यासाठी दत्ताने कितीतरी गुरु केले. पण अखेर स्वतःच स्वतःचा गुरु झाला. दत्त म्हणजे दिलेले. गुरु नाम देतो. नाम गुरुरूपच असते. गुरु, त्याने दिलेले नाम आणि भगवंत तिन्ही एकरूपच असतात. साधक गुणसंपन्न झाला की त्याला नामाचे प्रेम येते व त्यात गुरूचे अस्तित्व दिसते. पण गुणसंपन्न होण्यास नामच घ्यावे लागते. नामात गुरूला पाहणे हाच परमार्थ होय. म्हणून दत्त एकमुखी आहे."

काव्य सुमने

## सद्गुरूंची पालखी

घेवून निघालो सद्गुरूंची पालखी
झुलती मोत्यांच्या माळा, घेऊ नाम
मुखी ॥धृ.॥

जाईजुई फुलानी कमानी सजल्या
केसरी सड्यांच्या रांगोळी उजळल्या
टाळ आणि मृदंग बोलती संगे
रामनाम जप कानी गुंजे ॥१॥

पायघड्या पाटांच्या रांगोळीचा थाट
हालतो झुलतो मागे पुढे
शिंग तुतारी धर्म दंडसंगे
गर्जती भक्त शोभा फुलते ॥२॥

रामहनुमान पंचायन पुढे
भेटीसाठी तुझ्या आसुसली
माणगंगातीरी सोहळा हा भक्तीचा
धन्य नेत्र माझे सुखावती ॥३॥

पहाटेची आरती राऊळा उजळी
चंद्रप्रभा फाके दिशा दाही
धुप दिप सुगंध दर्वळे चोही
झुळुक तयाला वाऱ्याची पसरी ॥४॥

तन-मन-धन माझे पंचप्राण
अपूर्ण मी धरती सद्गुरु चरण
कुर्वंडी पेटली दिव्य तेज ज्योत
दर्शनाची ओढ आर्त होत ॥५॥

भिमराव ज्ञा. साळुंखे

काव्य सुमने

## श्री सद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी उत्सव

श्री गुरूंच्या पुण्यतिथीचा उत्सव
उत्साहे भरला.
दशदिन भव्य भरे दरबार ॥धृ॥

गंधित वायु चैतन्याचा
कोकीळ देई पंचस्वराला
वृक्ष वेली विनीत बोलल्या
चराचर संजीवन सोहळा
रम्य भव्य स्फूर्त भावना निजानंद
साकार.॥१॥

पुष्प पाकळ्या पायघड्यातून
रंग ही रंगले रांगोळीतून
झांज पताका मंडपातून
कार्य चाले प्रभू नामातून
गुरु शिष्याची नयन एकता सुख हे
अपरंपार॥२॥

गायन कीर्तन भजनी रमले
तन्मयतेने श्रवण रंगले
भान हरपले चित्त दंगले
गुरु चरणाशी मस्तक नमले
शरणांगत भाव मनीचे किती मानू
उपकार ॥३॥

देह त्यागिता श्री सद्गुरूंनी
चिर अस्तित्व हृदयी भरुनी
नाम प्राण हा दान देऊनी
भक्तजन सुपंथी लाऊनी
अलौकिक हे कार्य गुरुंचे नित्य मनी
संचार ॥४॥

अन्नदान हे तत्व गुरूंचे
नाम ज्ञान हे सार गुरुंचे
स्वीकारूनी हे कार्य गुरुंचे
सार्थक करुया इह जन्मीचे
गुरू पथावर पाऊल पडता जीवा
प्राप्त आकार ॥५॥

**सौ.प्रमिला अशोक कुलकर्णी**

## श्रीरामाचे ते नाव



श्रीरामाचे ते नाव
हीच हो ती नाव
पैलतीराचे ते गाव
दावील जे

श्रीरामाचे ते नाव
जागवी भक्तिभाव
भक्ताहृदयाचा ठाव
घेई जे

श्रीरामाचे ते नाव
श्वासोश्वासी भरावं
षड्रिपूंवर प्रभाव
करी जे

श्रीरामाचे ते नाव
श्रीमहाराजांकडून घ्यावं
जपत नित्य राहावं
कल्याणी जे



# आदरणीय निर्मला मामी केतकर

## श्रीमहाराजांच्या परिवारातील सोज्वळ, कणखर व प्रेमळ व्यक्तिमत्त्व

पूर्वी मालाडला केतकरांच्या घरी जाणाऱ्या कित्येकांनी एका नऊवारी नेसलेल्या, केसांचा सुबक अंबाडा घातलेल्या, गोऱ्यापान, देखण्या व प्रसन्न व्यक्तिमत्वाचे दर्शन घेतले असेल. त्या म्हणजेच श्रीमती निर्मलामामी केतकर. येणाऱ्या प्रत्येकाचा यथोचित आदर-सत्कार करणे, कोणालाही खाऊ-पिऊ घातल्या शिवाय न जाऊ देणे, हे जणू त्यांचे ब्रीदच होते. आजही त्या वास्तूत जाणारा प्रत्येकजण, आनंदाची व समाधानाची शिदोरी घेऊन जातो.

ती. भाऊसाहेब-बाईंनी लावलेलं आनंदाचं रोप, ती. आजी-तात्यांनी लहानाचं मोठं केलं. ती. दिनुमामा व मामी यांनी ते नीट सांभाळलं व नवीन पिढीने त्याचं डौलदार वृक्षात रूपांतर केलं. १९४८ च्या सुरवातीला तात्यांचे चिरंजीव दिनकरराव यांचा विवाह पंढरपूरच्या चि. सौ.कां. अंबू जोशी हिच्याशी झाला. अंबू आता निर्मला दिनकर केतकर झाली. मामी (निर्मला) केतकरांकडे आल्या व त्या अल्पावधीतच तात्यासाहेबांच्या लाडक्या सुनबाई झाल्या. काही विशेष काम असले की तात्यासाहेब हमखास ते मामींना सांगत.

लग्नाच्या वेळी मामींचे वय केवळ चौदा वर्षांचे होते. पंढरपूर सारख्या छोट्या गावातून त्या अचानक मुंबई शहरात आल्या होत्या. त्यामुळे सासूबाईंच्या (तात्यासाहेबांच्या पत्नी ताई) हाताखाली शिक्षण घेणे चालू झाले. १९४८ ते १९६७, जवळपास एकोणीस वर्षे मामींना तात्या व ताई या दोघांचाही सहवास मिळाला. येणाऱ्या जाणाऱ्याशी तात्या कसे वागतात, ताई घर कसे चालवतात, हे सर्व मामींच्या मनात चांगलेच ठसले व त्यांचीही मनोवृत्ती त्या दोघांसारखी होत गेली.

मामी मुळात अबोल, पण कष्टाळू व हसतमुख. केतकर घराणे तसे वेगळेच. येथे

## आदरणीय निर्मला मामी केतकर

श्रीगोंदवलेकर महाराजांची उपासना चालते. त्यामुळे भाविकांची अखंड ये-जा. घरातलं वातावरण धार्मिक. त्यामुळे सोवळं-ओवळं, सणवार व्यवस्थित व वेळेवर होत असत. दरम्यान १९५२ साली मामींचे बाळंतपण (घरीच) झाले व कु. कृष्णाबाईचा (आता सौ. विनया भावे) जन्म झाला. पाच वर्षांनी चि. राजाराम व १९६४ मधे चि. शांताराम. तिन्ही मुले तात्या-ताईंच्या हयातीतच झाली.

१९६७ साली तात्या गेले आणि वर्षभरात ताई. दोघांच्या जाण्याने केतकर कुटुंब हादरून गेले. पण हळुहळू सगळे सावरले. घर चालवणे व इथली परंपरा सांभाळणे, हे मामींच्या अंगावर पडले. हा काळ मामींच्या दृष्टीने कसोटीचा होता. पण त्यांनी हसतमुखाने सर्व सांभाळले. मामींचं काम व्यवस्थित, सुरेख, टापटिपीचे व अगदी वेळेवर. कामाचे नियोजन उत्तम. ह्यामधे त्यांना श्रीमहाराजांच्या शिष्यांची मदत झाली. त्यामधे श्री. वामनरावांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. या सर्व काळात मामी सर्व बाजूंनी तयार होत गेल्या. तात्या-ताईंचा मामींना खंबीर पाठिंबा होता. त्यामुळे मामींचा आत्मविश्वास वाढत गेला व त्याचा पुढील आयुष्यात उपयोग झाला. तात्या-ताईंनी मामींना मुलीप्रमाणे वागवले व पूर्ण विश्वास ठेवला. मामींनीही आपल्या वागण्याने तो विश्वास सार्थ ठरवला. त्यांचे कर्तृत्व इतके मोठे होते की महाराजांच्या मंडळींनी त्यांना ताईंच्या जागी सहजच स्वीकारले.

दिनुमामांचे W. D. Samant & Co. नावाचे दुकान होते. त्याची हळुहळू भरभराट होत गेली. नुकतेच सुरू झालेले दुकान ते भरभराटीचा काळ, या दोन्ही स्थितीत मामींनी आपल्या सोज्वळ वागण्यात फरक पडू दिला नाही. त्यामुळे सर्वांना त्यांच्याबद्दल अधिकच आदर वाटू लागला. त्यावेळी महाराजांकडे भरपूर मंडळी येत असत. मामींना माणसांची पारख अचूक होती. कोणाला काय जमेल हे त्यांना कळे. अशा सर्वांच्या मदतीने मामींनी निरनिराळ्या उत्सवांची व्यवस्थित घडी घालून घेतली व आयुष्यभर त्याप्रमाणे उत्सव साजरे केले. घरात नणंदा असत, त्यांची मुले असत. या भाच्याना मामींनी नेहमीच स्वतःच्या मुलांसारखे वागवले. नणंदा-भावजयाही नेहमी बहिणी-बहिणींप्रमाणे राहिल्या. मुलांच्या शालेय अभ्यासाच्या बाबतीत त्यांनी कडक धोरण स्वीकारले.

स्मृती सुमने

**तात्या-ताईंनी मामींना मुलीप्रमाणे वागवले व पूर्ण विश्वास ठेवला. मामींनीही आपल्या वागण्याने तो विश्वास सार्थ ठरवला. त्यांचे कर्तृत्व इतके मोठे होते की महाराजांच्या मंडळींनी त्यांना ताईंच्या जागी सहजच स्वीकारले.**

महाराजांची मंडळी कर्नाटकात चिंतामणी, गदग, वेंकटापूर, इत्यादी ठिकाणी सुध्दा होती. मामींना ते सर्वजण देवीप्रमाणेच समजत व त्याप्रमाणेच त्यांना आदराची वागणूक देत. केरळ मधील कान्हनगड किंवा कांञनगड येथे दिनूमामा व निर्मलामामींचे जाणे-येणे असे. तेथेही मामी सहज समरस होत असत. या सगळ्यात रोजचा रामनाम जपाचा नेम त्यांनी कधी चुकवला नाही. त्यांचे रोजचे दासबोध वाचन, पोथीवाचन ही व्यवस्थित सुरू असे. दरम्यानच्या काळात मालाडचा बंगला जाऊन नवी इमारत उभी राहिली होती. नव्या घरात महाराजांचा हॉल ज्या पहिल्या मजल्यावर होता तेथेच मामी व दिनूमामा यांचा मुक्काम असे. नव्या इमारतीत पूर्वीप्रमाणेच नित्यनैमित्तिक उपासना व्यवस्थित सुरू झाली. या सर्वांवर मामींची देखरेख असे. या पैकी काही मधे, विशेषतः बायकांच्या

## आदरणीय निर्मला मामी केतकर

भजनात मामी स्वतः भाग घेत. त्या भजन खूप छान म्हणत. त्यामुळे इतर बायकांना सुध्दा प्रोत्साहन मिळून त्याही उत्तम भजन म्हणू लागल्या.

प्रत्येक उत्सवात, म्हणजे गुरूपौर्णिमा सप्ताहात, रामनवमीला, कधी काय स्वयंपाक करायचा, कोणता पदार्थ करायचा, हे सर्व निर्णय मामींचे असत. सर्वांचा अनुभव असा की त्या सणाला तो स्वयंपाक अगदी साजेसा असे. एकदा छोट्या नातवाने, शाळेतली दिंडी पाहून, "आपल्या कडेही दिंडी करूया" असं म्हटलं. आणि दिंडी सुरू झाली आवारातच. हॉल मधे फिरून जिन्याने खाली जायचं व मागच्या जिन्याने परत हॉल मधे. पण कलाकार बरेच असल्याने भजने ऐकण्याची चंगळ असे. त्यानंतरच्या जेवण/नाश्ता यावर मामींची देखरेख असे. गुरुपौर्णिमेच्या पंक्तींमधे मामींनी केलेला आग्रह ही तर केवळ अनुभवण्याची गोष्ट. कोणाला किती आग्रह केला तर चालेल हे त्यांना बरोब्बर माहीत असे. त्यामुळे मामी वाढायला आल्या की सगळे सावरून बसत.



२००८ च्या सुरवातीला मामा-मामींच्या लग्नाला साठ वर्षे पूर्ण झाली. मुलांनी त्यांची शर्करातुला केली व ती साखर योग्य ठिकाणी दान केली. पण त्याच वर्षी एक वाईट घटना घडली. अचानक दिनूमामांना शेवटच्या स्टेजचा कॅन्सर झालेला आढळला व लवकरच ते गेले. त्यांच्या पश्चात चौदा वर्षे मामींनी घरातल्या व महाराजांच्या, रोजच्या व उत्सवातल्या प्रथांमध्ये अजिबात फरक पडू दिला नाही. २०११ मधे एका गंभीर आजारपणातून त्या बऱ्या झाल्या, पण शक्ती एकदम कमी झाली. पुढे २०२० साली झालेला करोना, या सर्वांमुळे मामींची तब्येत खालावत गेली. आहारही कमी झाला.

शेवटची चार-पाच वर्षे, गुरुपौर्णिमा झाली की त्या म्हणायच्या, 'कुणास ठाऊक, पुढच्या गुरूपौर्णिमेला मी असेन की नाही?' अखेर २०२२ साल उजाडले. गुरुपौर्णिमा व्यवस्थित पार पडली. सप्ताहात मामींची प्रकृती बरी नव्हतीच. पण इच्छाशक्तीच्या जोरावर मामी श्रीमहाराजांच्या हॉलमधे थोडावेळ येऊन बसत. अखेर चोवीस जुलैला सकाळी त्या आपणा सर्वांना सोडून गेल्या. नव्हे, त्या आपल्यात आहेतच आणि सर्वांना जिद्दीने काम करण्याची प्रेरणा देत आहेत. त्यांच्या पश्चात त्यांचे दोन्ही मुलगे व दोन्ही सुना यांनीही सर्व प्रथा-परंपरा कालानुरूप बदल करून सुरू ठेवल्या आहेत.

आनंद भावे (निर्मलामामींचे जावई) व सौ.विनया आनंद भावे (कृष्णाबाई- कन्या)



## माझे परमपूज्य बाबा म्हणजेच श्री सुरेश बोंद्रे अण्णा

गोंदवले संस्थानचे माजी विश्वस्त

२०१८ सालचा नोव्हेंबर महिना होता. बाबांची पंचाहत्तरी साजरी करण्यासाठी अमेरिकेहून भारतात गेलो होतो. सहज पाय मोकळे करावे म्हणून मी बाबांबरोबर मॉर्निंग वॉकला बाहेर पडलो. आमच्या घराजवळच्या बागेत बसून अनेक विषयांवर मनमोकळ्या गप्पा मारल्या. तेव्हा सहज बोलताना ते मला म्हणाले "जास्त विचार करू नकोस, प्रत्येक क्षण आनंदात घालव." माझा खूप विचार करण्याचा स्वभाव आहे हे ओळखून बहुधा त्यांनी मला सुचवलं असावं.

"श्रीमहाराजांनी आपल्याला लायकी पेक्षा खूप जास्त दिले. स्वतःची काळजी घे पण काळजी करू नको. आपण लोकांना घरी बोलवावे, त्यांना भरपूर खायला घालावे व आपले आयुष्य भगवत्भक्तीत व रामनामात सुखात आणि समाधानात घालवावे हे श्रीमहाराजांचे विचार तू कधी विसरू नको" हे त्यांचे नेहमी मला सांगणे असे.

खरोखर बाबांनी आपल्या जीवनात श्रींचे हे तत्व तंतोतंत पाळले.त्यांचे व्यक्तिमत्व अतिशय प्रसन्न व स्वभाव आनंदी आणि प्रेमळ होता. त्यांना कधीही आजार झालेला माझ्या आठवणीत नाही. त्यांची तब्येत उत्तम असे व त्यांना कुठलीही औषधाची गोळी नव्हती. म्हणून जेव्हा मला कळले की बाबा देवाघरी गेले तेव्हा माझे मन सुन्न आणि विषण्ण झाले. माझा विश्वासच बसेना किंबहुना अजूनही विश्वास बसत नाही आहे. मग माझ्या मनांत "आयुष्याचा भरवसा  नाही म्हणून शक्य तितक्या त्वरेने आणि तन्मयतेने कृतार्थ होण्याचा प्रयत्न करावा" हे श्री ब्रह्मानंद महाराजांचे मोक्षप्राप्तीचे रहस्यातलं वाक्य आठवलं. बाबा आपल्या सद्गुरूंना प्रिय असलेले रामनाम घेऊन व श्रीरामाची निष्काम भक्ती करून कृतार्थ झाले.

माझ्या लहानणापासूनच ते मला Role Model होते. त्यांचे हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व, स्पष्टवक्तेपणा, शिस्तप्रियता आणि सेवाभावी वृत्ती हे गुण वाखाणण्यासरखे होते. Academics मध्ये त्यांनी प्रावीण्य मिळवलंच पण व्यवसायात देखील त्यांनी यशाचे शिखर गाठलं. सर्व विषयांवर त्यांचा गाढा अभ्यास व अफाट वाचनामुळे ते कोणत्याही विषयावर प्रभावीपणे बोलायचे. त्यांनी योग प्रशिक्षण घेतल्यानंतर योगाचे मार्गदर्शक म्हणून अनेक लोकांना मार्गदर्शन केले. त्यांचा योगा

विषयीचा लेख एका नियतकालिकामध्ये अलीकडेच माझ्या वाचनात आला. त्यावरून त्यांची तयारी व सल्ला बऱ्याच लोकांना फायदेशीर झाला ह्याची जाणीव होते.

बाबांचा द्रष्टेपणा माझ्या आयुष्याचा प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यात वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे प्रखरपणे जाणवला. मग ते शिक्षणात असो किवा करिअर, नोकरी किंवा इतर काही महत्त्वाचे निर्णयप्रक्रियेत असो. त्यांना माणसांची चांगली पारख होती आणि उत्तम व्यवहार ज्ञान होते. व्यवहारात आपण कधी लबाडी करू नये पण दुसऱ्यांची लबाडी ओळखता येण्याइतपत आपण लबाड असावं हे श्रीमहाराजांचे सांगणे तू लक्षात ठेव आणि तसा वाग असे मला ते सतत सांगत. त्यांच्या ह्या अनमोल मार्गदर्शनामुळे मी यशस्वी होऊ शकलो. त्यांनी दैनंदिन जीवनात नीतिमत्तेने आणि पारदर्शकपणे व्यवहार केला. त्यांच्या पद्धतशीर कार्यपद्धतीचा आदर्श माझ्यासमोर नेहमीच राहील.दशलक्ष योनीतून प्रवास केल्यानंतर मनुष्य जन्माचे भाग्य मिळतं असं म्हटलं जातं. मी तर म्हणीन की मला अनंत कोटी जन्माचं पूर्वसंचित असल्यामुळेच अशा आदर्श बाबांचा सहवास मिळाला  आणि त्यांच्यामुळेच श्रीमहाराजांसारखे आदर्श सद्गुरु लाभले. हे केवढं मोठं भाग्य... त्यांनी माझ्यावर केलेले संस्कार मी कधीच विसरू शकत नाही.



आ. बापूकाकांबरोबर चर्चा करताना

त्यांच्या स्वभावाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची सहजता आणि सर्वांवर असलेले निस्वार्थी आणि निरपेक्ष प्रेम. त्यामुळे त्यांनी माणसे जोडली. त्यांचा लोकसंग्रह खूप मोठा होता आणि म्हणूनच श्रीमहाराजांना आवडणारे जनप्रियत्व त्यांना लाभलं. असंख्य लोकांनी त्यांच्यावर भरभरून प्रेम केले. कुठलीही गोष्ट किंवा प्रसंग अगदी सरळ सोप्या शब्दात समजावून सांगायची दैवी देणगी त्यांना लाभली होती. श्रींचे विचार त्यांनी आपल्या निरुपणाद्वारे आपल्या गुरुबंधू व भगिनीं पर्यंत पोहचवले व अनेकांच्या शंकांचे निरसन केले. लोकांच्या चुका पण कोणाचे अंत:करण न दुखवता त्यांना पटेल अशा शब्दांत खुबीनं समजावून सांगण्याची कला त्यांना उपजत होती. परमपूज्य तात्यासाहेब केतकर व परमपूज्य बाबा बेलसरे ह्यांचा सत्संग त्यांना मिळाला. ही खूप मोठी भाग्याची गोष्ट आहे. त्यांच्या हृद्य आठवणी व श्री महाराजांच्या गोष्टी सांगण्यात ते इतके रमून जात की अनेकदा भावना विवश होउन त्यांच्या डोळ्यात पाणी यायचं.



उत्सवाची काटेकोर आखणी करताना
श्री पाठक काकांसोबत

१६ वर्षे श्री क्षेत्र गोंदवले संस्थानाचे विश्वस्त म्हणून मनोभावे सेवा केली. शतसंवत्सरी वर्षाचा सोहोळा उत्तम पार पाडावा ह्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले व कार्यास पूर्णपणे झोकून दिले. त्यावर्षी (२०१३ साली) मला गोंदवल्याला जाण्याचा योग आला तेव्हा लक्षात आलं कि त्यांना संपूर्ण दिवसात अर्धा एक तासंच झोप मिळे. आम्ही त्यांना विचारले की तुम्हाला एवढी शक्ती आणि stamina कुठुन मिळतो तेव्हा ते म्हणायचे, “मी कुठे काय करतोय? श्रीमहाराजंच माझ्याकडून करवून घेतात.”

अलीकडे covid काळात माझं वारंवार WhatsApp वर त्यांच्याशी बोलणे व्हायचे. त्यावेळी त्यांनी मला २ बोधवचने सांगितली ती माझ्या मनात कायमची घर करून राहतील.

१. तू जगात असा वाग की तू लोकांना हवाहवासा वाटला पाहिजे.

२. तू कुठलेही कृत्य चांगलं केलं की वाईट केलं हे कसे ओळखशील? तर आपल्या सद्गुरू श्रीमहाराजांना ते आवडणारं असेल तर ते चांगले, नाही तर वाईट! इतके ते सोपे आहे.

शाखांभरी पौर्णिमेच्या पुण्यकाळी दिनांक २८ जानेवारी २०२१ रोजी त्यांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली. त्याच दिवशी गुरुपुष्यामृत योग पण होता. मला खात्री आहे की ते श्रीमहाराज चरणी विलीन झाले व त्यांना सद्गती मिळाली आणि मोक्ष प्राप्त झाला. बाबांचे आयुष्याच्या प्रवासाचं वर्णन करायचे झाले तर ते खालील संस्कृत श्लोकात करता येईल– अनायासेन मरणं। विना दैन्येन जीवनम्। देहान्ते तव सायुज्यम्। देहि मे परमेश्वर ।। वेदना आणि दीर्घकाळापर्यंत आजार न होता सहज मृत्यु, दैन्यावस्थेशिवाय जीवन आणि शेवटी परमेश्वरात एकरूप होऊन परमपदापर्यंत पोहचण्याचे भाग्य श्रीकृपेने त्यांना लाभले. आज जरी ते देहाने नसले तरी मनाने आपल्या सर्वांच्यात कायम राहतील. त्यांनी आपल्या निरूपणात सर्वांना सांगितलेले श्रीमहाराजांचे विचार व तत्त्वाचे मनन व चिंतन करून आचरणात आणण्याचा प्रयत्न करू. श्रींच्या कृपेचा वर्षाव सदैव आपल्यावर राहो ही सद्गुरू चरणी प्रार्थना करतो.

अधीत बोंद्रे





पालखी प्रदक्षिणा सोहळा – श्री परांजपे काका वा श्री पाठक काकांसोबत

स्मृती सुमने

# सदाशिव जनार्दन गद्रे

**श्रींचे एक प्रसन्न, मितभाषी व निष्ठावंत शिष्य**

माझे वडील श्री. सदाशिव जनार्दन गद्रे, हे श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांचे निःसीम भक्त होते. त्यांचे आईवडील श्रीमहाराजांचे अनुग्रहीत आणि भक्त होते. तोच वारसा त्यांना मिळाला. वयाच्या २५व्या वर्षापासून ते गोंदवल्याला जाऊ लागले. श्रीमहाराजांचा अनुग्रह घेतला. तेव्हापासून गोंदवल्याला श्रीमहाराजांच्या पुण्यतिथी उत्सवाला १० दिवस ते नेहमी हजर असायचे. स्वयंपाकघरात सेवेला असायचे. रजा मिळो न मिळो, त्याची कधीच ते पर्वा करीत नसत. शेवटपर्यंत त्यांचा उत्सव कधीच चुकला नाही. तसेच त्याच सुमारास ते पुणे येथील रविवारच्या श्रीमहाराजांच्या आरतीला जाऊ लागले. भजनाची त्यांना अतिशय आवड होती. ती (उपासनाही) रविवारची आरती अगदी अपरिहार्य कारण सोडून शेवटपर्यंत कधीही चुकली नाही. चिकाटी आणि सातत्य हे त्यांच्यातील मोठे गुण होते. निवृत्त (Retired) झाल्यानंतर तर रविवारची श्रीमहाराजांची आरती व्यवस्थित होणे, हेच त्यांचे जीवन होते. आठवडाभर तेच अनुसंधान त्यांना असायचे.



श्रीमहाराजांची माणसं हेच माझ कुटुंब, असं त्यांना वाटायचं. सगळ्यांची अगदी प्रेमाने विचारपूस करायचे. त्यामुळे आरती मंडळातील सगळ्यांना त्यांच्याबद्दल आपुलकी वाटायची. श्रीमहाराजांचे काम म्हटले की ते कश्शाचीही पर्वा करीत नसत. आणि त्यासाठी भरपूर वेळ काढीत असत. प्रसन्न, हसतमुख, आनंदी आणि उत्साही असं त्यांच व्यक्तिमत्व होतं. कधीही कशाबद्दल तक्रार नसायची. आतबाहेर अगदी सरळ होते. हा त्यांचा, देहस्वभाव होता. कोणी केव्हाही हाक मारा, ते हजर असायचे मदत करायचे, पण त्याबद्दल दुसऱ्याकडून कधी कशाची अपेक्षा नसायची. मदत झाल्यानंतर ते तिथे थांबत सुद्धा नसत. त्यांची बुद्धी अतिशय तल्लख होती. ऑफिसमधील लोक त्यांना computer म्हणायचे. श्रीमहाराजांच्या पुष्कळ माणसांचे पेन्शनचे काम त्यांनी करून दिले. पुष्कळ माणसांची लग्ने जुळवली. पुष्कळ आजारी माणसांना मदत केली. कोणी आजारी आहे, असे कळले की हे तिथे हजर असायचेच. सगळ्यांशी प्रेमाचे संबंध होते. देशभक्तीसुद्धा भरपूर होती. सावरकरांना बंदी म्हणून ठेवले ते ठिकाण पहाण्यासाठी अंदमानपर्यंत जाऊन आले.

तीर्थयात्रेची सुध्दा त्यांना आवड होती. भारतातील बहुतेक सर्व तीर्थांचे दर्शन त्यांनी घेतले होते. रोज संध्याकाळी प्रवचन किंवा कीर्तनाला ते जायचेच. कंटाळा, आळस हे शब्द त्यांच्या Dictionary मधेच नव्हते. आळसाने स्वस्थ बसलेले आम्ही त्यांना कधीच पाहिले नाही. कुठलेही काम ते पुढे ढकलत नसत लगेच करून मोकळे होत. अतिशय कर्तबगार व्यक्ती होते, त्यांची प्रत्येक कृती शिस्तबद्ध असायची. कुठलीही गोष्ट व्यवस्थित नियोजन करूनच करायचे. तसेच त्यांच्या जीवनात वेळेला अतिशय महत्व होते. केव्हाही वेळेच्या आधी १५ मिनिटे ते हजर असायचे. तसेच पैशाच्या बाबतीतही अतिशय प्रामाणिक होते. व मदतगार होते.

श्री महाराजांच्या शिकवणुकी प्रमाणे घरी अक्षरशः ते पाहुण्यासारखे रहात होते. अमुक

म्हणून त्यांनी कधी मागितलं नाही. तुम्ही दिलं तरच घ्यायचे. आपणहून कधी काही घेतलं नाही. श्रीमहाराजांवर असलेल्या श्रध्देच्या जोरावर त्यांनी कधी काळजी केलेली आम्ही पाहिली नाही. श्रीमहाराज उत्तमच करतील असे ते नेहमी म्हणायचे.



त्यांचे वडील लवकर गेले. घरची गरिबी. त्यामुळे लहानपणीच प्रपंचाची सर्व जबाबदारी त्यांच्यावर पडली. तरीही कोणासमोर हात न पसरता, आई, बहीण, भाऊ सगळ्यांना सांभाळत सांभाळत स्वतः कष्ट करून शिक्षण घेतले. नंतर PWD मधे नोकरीला लागले. तिथे परीक्षा देत देत Accounts officer पर्यंत पोहोचले. स्वत: गरीबीत दिवस काढले, पण आम्हाला त्याची कधीही जाणीव होऊ दिली नाही. आम्हाला कधी कमी पडू दिले नाही. स्वत: हुशार असून सुद्धा परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. गणितात ते अतिशय हुशार होते. मुलांनी शिकून चांगलं मोठे व्हाव, अशी त्यांची इच्छा होती. विनय चांगलं शिकून अमेरिकेला गेला, याच त्यांना समाधान होतं. घरातल्या माणसांवर त्यांच अतिशय प्रेम होत, पण प्रेम दाखवण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता.

कितीतरी वर्ष रोज भिकारदास मारुतीचे दर्शन घेण्याचा त्यांचा नियम होता. तो शेवटपर्यंत चालू होता. आवड म्हणून कीर्तन सुद्धा शिकले होते. त्यांचा मृत्यू त्यांना आधीच माहित झाला होता. २०१५ सालच्या पुण्यतिथी उत्सवाला ते गोंदवल्याला आले होते. त्या दरम्यान पुण्याला ज्यांच्या घरी रविवारची आरती झाली, ते लोक आरती संपवून गोंदवल्याला आले असताना त्यांना भेटायला आले. ते लोक म्हणाले, “काका, तुम्ही आमच्याकडे आरतीला आला नाहीत!” तेव्हा ते म्हणाले, “हा माझा शेवटचा उत्सव आहे, त्यामुळे मी इथे गोंदवल्यातच आहे.” घरीही ते सूचक बोलत असत. म्हणत की “आता माझे काही जास्त दिवस नाहीत. आता तुम्ही जबाबदारी घ्या.”

जाण्याच्या आधी २० दिवस ते गोंदवल्याला जाऊन आले. तिथे त्यांनी मनापासून श्रीमहाराजांच दर्शन घेतलं. काकड आरती, भजनसेवा सगळं व्यवस्थित केलं. तिथून पुण्याला आले आणि आजारी पडले. मधेमधे बेशुद्धीत जात असत. पण ते जे काही १५-२० दिवस आजारी होते, त्यामधेदेखील श्रीमहाराज आणि भजन सोडून दुसरं काही बोललेच नाहीत. त्यावेळेसच त्यांना श्रीमहाराज, श्रीविष्णू, श्रीमारुतीरायांचे दर्शन झाले. ते सांगत असत, “श्रीमहाराज, श्रीविष्णू, श्रीमारुतीराय आलेले आहेत, दर्शन घ्या.” सारखे ‘महाराज, महाराज’, हाका मारीत असत. “गोंदवल्याला गेलो होतो, श्रीमहाराजांचे उत्तम दर्शन झाले. आता यापुढे महाराज जे करतील, ते उत्तमातलं उत्तम करतील.” हे त्यांचे शेवटचे शब्द होते. मृत्यूचे भय त्यांना कधीच वाटले नाही. मृत्यूला अत्यंत सहजतेने सामोरे जाताना आम्हाला पहायला मिळाले. हा पुण्यात्मा शेवटी अगदी शांतपणे दि. २६-६-२०१६ रोजी श्रीमहाराजांच्या चरणी विलीन झाला. श्रीमहाराज अंतकाळ कसा साधतात, हे आम्हाला प्रत्यक्ष पहायला मिळाले.

विनय गद्रे / विदुला गद्रे

श्रींची उपासना केंद्र



# छ. संभाजीनगर येथील श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर उपासना केंद्र

श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांचे विशेष कृपा मराठवाडा प्रांत म्हणून १९९१ सन झालेली दिसून येते. महाराजांच्या इच्छेनुसार संभाजीनगर मधील श्री रामचंद्र कृष्णाजीपंत दीक्षित यांच्यामार्फत जणू महाराजांनी केंद्ररूपी कायमस्वरूपी नामस्मरणाचे शिदोरी ही संभाजीनगरला दिलेली दिसून येते. त्या शिदोरीला पूर्ण स्वरूप प्राप्त होण्यासाठी श्री दीक्षित यांनी दानपत्राद्वारे सदर वास्तू महाराजांना समर्पित केली.

त्यानंतर राम नामाचा प्रचार, प्रसार व्हावा या हेतूने श्री गोंदवले संस्थान यांनी सुद्धा सदर वास्तूचा सन २०१९ मध्ये जीर्णोद्धार केला. या इमारतीच्या वास्तुशांतीसाठी गोंदवले येथील मुख्य विश्वस्त श्री पाठक काका, श्री परांजपे काका, श्री मनोहर काका व श्री गुळवणी काका यांनी उपस्थित राहून शहरातील साधकांचा उत्साह वाढवला. आतापर्यंत या संपूर्ण प्रवासामध्ये महाराजांच्या कृपा इच्छेने श्री नाडकर्णी, श्री थोरात, श्री नलावडे, श्री साळुंखे, श्री प्रमोद फडणीस, अनिल पाटील यांनी प्रथम दिवसापासून उपासना तेवत राहण्यासाठी प्रयत्न केले. तसेच गोंदवले संस्थानच्या मार्गदर्शनानुसार अर्चक म्हणून श्री विनायक धानोरकर यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली. यापूर्वी संस्थानतर्फे कै. अरुणराव देशपांडे, कै.जोशी काका (डीएसपी) यांनी कारभार चोख बघितला. जिर्णोद्धाराची जबाबदारी श्री गणेश फडणीस यांच्याकडून श्रीमहाराजांनी पूर्ण करून घेतली. केंद्रामध्ये रोज खालील प्रमाणे उपासना होते

१) श्रींची पूजा व सायं उपासना

२) रविवार काकड आरती



### छ. संभाजीनगर केंद्रात साजरे होणारे उत्सव–

**श्रींचा जन्मोत्सव** – प्रतिवर्षाप्रमाणे तीन दिवसांचा श्रींचा जन्मोत्सव साजरा केला जातो. उत्सवाची सुरुवात कोठी पूजनाने होते. तसेच सकाळी तेरा तासांचा अखंड रामनाम पहारा, सकाळी काकड आरती, विष्णुसहस्त्रनाम, राम हृदय तसेच सायंकाळची उपासना यामध्ये तीनही दिवस वेगवेगळ्या प्रवचनकारांचे प्रवचन, कीर्तन व गायन सेवा असा भरगच्च कार्यक्रम होत असतो. जन्मोत्सवाच्या दिवशी सकाळी काकड आरती नंतर गोंदवले येथील परंपरेप्रमाणे पंचपदी, महाराजांचा जन्मोत्सवाचा गुलाल व त्यानंतर पालखी उत्सव होत असतो. पालखी उत्सव झाल्यानंतर दुपारी साडेबारा वाजता महाप्रसादाचे आयोजन केले जाते. त्यास १००० ते १२०० भक्तगण उपस्थित असतात व प्रसादाचा लाभ घेतात.







**गुरुपौर्णिमा उत्सव:** त्याचप्रमाणे शहरातील ज्येष्ठ नागरिकांना ज्येष्ठ साधकांना गोंदवले येथे गुरुपौर्णिमेसाठी जाणे शक्य नसल्यामुळे श्री गोंदवले संस्थानचा परवानगीने येथे गुरुपौर्णिमा उत्सव सुरू करण्यात आला. हा गुरुपौर्णिमा उत्सव जे साधक गोंदवल्यास जाऊ शकत नाही त्यांच्यासाठीच सुरू करण्यात आला.

या वर्षी महिला साधकांसाठी माहेरवाशीण एक दिवसीय शिबीर घेण्यात आले. ४० महिलांनी सहभागी झाल्या. शिबिरात एकूण ८.५० लाख जप नोंदवण्यात आला.

उपरोक्त सर्व उपासना व उत्सव हे गोंदवले संस्थांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून सध्या उपासना केंद्राची जबाबदारी म्हणून श्री गजानन कुलकर्णी हे बघत आहेत. त्यांना डॉक्टर गणेश फडणीस, श्री नलावडे, श्री फडणीस, श्री अवधूत नाकाडे, श्रीम. प्रज्ञा कुलकर्णी, श्री प्रशांत पांडे, श्री क्षीरसागर, श्री सहस्रबुद्धे यांचा सहभाग मोलाचा असतो. येत्या वर्षी महाराजांच्या जयंती उत्सवात श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे त्याचा सर्व भक्तांनी लाभ घ्यावा.



स्वानुभव सुमने

परमार्थ प्रधानतः अनुभवाचे शास्त्र आहे. परमार्थाच्या दृष्टीने साधकाची साधनेमध्ये जशीजशी प्रगती होत जाईल तशी तशी त्याच्या ठिकाणी भगवंताबद्दल स्वाभाविक आवड निर्माण होणे तसेच या जगातील मान, लौकिक, पैसा घरदार नातेवाईक इत्यादी गोष्टीबद्दल आवड अगदी आतून कमी होत जाणे हा खरा अनुभव आहे. तरीसुद्धा सामान्य प्रापंचिकाला सुरवातीला भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव व्हावी किंवा या मार्गात पाऊल पडावे अशा दृष्टीने प्रपंचात मदत होणाऱ्या अनुभवांना या मार्गात महत्व आहेच. अशा अनुभवांनीही परमार्थ मार्गात सामान्य माणूस वाटचाल करू लागतो व भगवंत अथवा सद्‌गुरू यांच्या अस्तित्व भावनेने त्याच्या काळजीचे प्रमाण काही प्रमाणात तरी कमी होतेच. अशा अनुभवांपैकी काही अनुभवांचे उल्लेख येथे केले आहेत तरी खरा अनुभव साधनेत प्रगती होणे हा आहे, हे आपण लक्षात ठेवावयास हवे.

# मला आलेले श्री महाराजांचे अनुभव

आमचे गाव हे सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील सिद्धेश्वर कुरोली आहे. हे गाव महादेवाचे स्वयंभू देवस्थानामुळे प्रसिद्ध आहे. कामानिमित्त सर्वजण बाहेरगावी असतात. माझी मुले देखील नोकरी निमित्ताने पुणे येथे स्थायिक झालेली आहेत. आमचे घरास पहिल्यापासूनच श्री गोंदवलेकर महाराजांची ओढ आहे व प्रचिती देखील आहे याचे मुख्य कारण म्हणजे माझे वडील श्री गोविंद भिकाजी गोसावी, माझे चुलते श्री विष्णुपंत गोसावी व माझी आत्या गोदूबाई गोसावी. लग्नानंतर गोदूबाई मोकाशी यांचा श्रीमहाराजांनी लहानपणापासून सांभाळ केला. माझ्या वडिलांची व चुलते यांची मुंज श्रीमहाराजांनी केलेली आहे. त्यामुळे आम्हा सर्वांना श्रीमहाराजांविषयी निस्सिम श्रद्धा आहे. मला आलेला अनुभव कथन करतो, तेव्हा अंगावर काटा येतो व श्रद्धेने डोळे भरून येतात.

मी खाजगी नोकरी करत होतो. १९५८ साली मला कंपनीने कोल्हापूर वरून शहाबाद मैसूर स्टेट येथे पाठवले, त्यावेळी महाराष्ट्रातून हैदराबादला जायचे हे माझ्या मनाला पटत नव्हते परंतु परिस्थितीमुळे जाणे भाग पडले. त्या भागात जाताना मी अतिशय बेचैन होतो. माझ्यासाठी सर्व माणसे व परिसर अनोळखी होता. आपले कसे होणार या चिंतेत माझा रेल्वे प्रवास सुरू झाला. दरम्यान माझा प्रवासात डुलका लागला होता पण अचानक जाग आली व श्रीमहाराजांचे अस्तित्व प्रकर्षाने जाणवले आणि मन अगदी आश्वस्त आणि शांत झाले. शहाबादला पोहोचून मी कंपनीमधे जाईपर्यंत त्यांच्या अस्तित्वाची जाणीव टिकून राहिली. हा अनुभव आठवला तरी डोळे भरून येतात.

एकदा आम्ही सर्वजण शिखर शिंगणापूर येथे शंभू महादेवाचे दर्शन घेण्यासाठी निघालो. तेथे पोहोचल्यावर आम्ही दर्शन घेतले व परतीच्या प्रवासास सुरुवात केली. त्यावेळी दुपारचे साडेचार झाले होते. अधून मधून पावसाची रिमझिम सुरू होती. आमचा प्रवास सुरू असताना अचानक आमची गाडी थांबली व आवाज झाला. आवाज कशाचा झाला या शोधाअंती असे

स्वानुभव सुमने

# मला आलेले श्री महाराजांचे अनुभव

समजले की, गाडीचा एक्सेल तुटला हे कळले. तेव्हा आम्ही मोगराळे घाटाच्या जवळच होतो. आमच्या गाडीचा ड्रायव्हर आम्हाला म्हणाला, “एक्सेल व फिटर घेऊन यायला निदान तास-दीड तास लागेल मी घेऊन येतो तुम्ही सर्वजण गाडीत बसा बाहेर जाऊ नका” असे म्हणून ड्रायव्हर दुसऱ्या गाडीत बसून गेला. तो गेल्यावर सर्वजण असे कसे झाले यावर चर्चा करू लागले. जोपर्यंत दिवस होता तोपर्यंत काही वाटले नाही, सायंकाळ व्हायला लागली तसेच सर्वजण अस्वस्थ होऊ लागले कारण गाडीमध्ये आठ स्त्रिया व केवळ एक पुरुष. सर्वजण घाबरायला लागल्यावर आम्ही महाराजांचे नामस्मरण करायला सुरुवात केली. अंधार पडायला लागला तसे सर्वजण घाबरले. इतक्यात एक गृहस्थ हातात काठी घेऊन गाडी जवळ आले त्यांनी सर्व विचारपूस केली व म्हणाले, “सर्व बाया माणसे आहेत रस्त्यात थांबू नका तुम्ही माझ्या गोठ्यावर चला चहा पाणी घ्या तोपर्यंत गाडी दुरुस्त होईल मग तुम्ही जा.” पण गाडीतले कोणी जायला तयार होईना. “तुम्ही महाराजांच्या दर्शनाला आला होता गाडी बिघडली यात तुमचा काय दोष? पण तुम्हाला असे सोडून कसा जाऊ? महाराज काय म्हणतील?” असे म्हणून ते गृहस्थ तिथेच थांबले. आठ वाजता ड्रायव्हर मेकॅनिकला घेऊन परत आला. गाडी दुरुस्त झाल्यानंतर ते गृहस्थ “बरं या आता!” असे म्हणून निघून गेले. ते दुसरे तिसरे कोणी नसून प्रत्यक्ष महाराज त्यांच्या रूपाने आले अशी आमच्या सर्वांची खात्री पटली.

तिसरा अनुभव- आम्ही सर्व महाराजांना आमच्या कुटुंबातलेच एक प्रमुख मानणारे. दिवाळीचा सण होता, माझा थोरला मुलगा दिवाळीसाठी पुण्याहून आला होता. पाडव्याला आम्ही अभ्यंग स्नान करून देवदर्शनाला गेलो. वाटेत त्यानी विषय काढला, म्हणाला, “मामा आपण गोंदवले दर्शनाला जाऊया का?” त्यावेळी साडेदहा वाजले होते. मी काहीही बोललो नाही पुन्हा तो म्हणाला, “आपण जाऊया का?” मी नाईलाजाने निघालो कारण माझे मनात एकच विचार की आता साडेअकरा वाजलेत आपणास जाण्यास कमीत कमी दोन तास लागणार. जाईपर्यंत प्रसादाची वेळ होऊन ते बंद होणार. आयुष्यात पहिल्यांदा समाधीवरून प्रसाद न घेता माघारी यावे लागणार ही मनाला खंत होती. प्रवासात तो मला सारखे काहीतरी विचारायचा पण माझे त्यांच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते कारण आपण त्याला घेऊन जातोय, पण प्रसाद मिळणार नाही ही चिंता सतावत होती. गोंदवले आले, आम्ही गाडी पार्क केली. आत गेलो तेव्हा पंगत उठत होती. इतक्यात एका ओळखीच्या सेवेकरी भक्ताने विचारले, “गोसावी तू प्रसाद घेतलास का?” त्यावर म्हणालो “नाही.” त्यावर ते म्हणाले, “हात पाय धुऊन घ्या आणि प्रसाद घ्या. आम्ही वाढपी बसणार आहोत” नकळत माझे डोळे पाणावले. महाराजांनी मला व मुलाला प्रसादापासून वंचित ठेवले नाही व आपल्यावर महाराजांचे लक्ष आहे याची खात्री पुन्हा एकदा खात्री पटली.

मुरलीधर गोविंद गोसावी

श्रीमहाराज
उपदेशामृत

## मनुष्य जन्मात मिळवावे काय, टाकावे काय?<br>बरे काय वाईट काय?

असत्यासारखें दूषण नाहीं ॥ सत्यासारखें भूषण नाहीं ॥ शांतीसारखा अलंकार नाहीं ॥ कुसंगाएवढें पाप नाहीं ॥ निरीच्छ असून कल्पनातीत वागण्यासारखें ज्ञान नाहीं ॥ तळमळ सोडण्यासारखें सुख नाहीं ॥ स्त्रिया, पुत्र, किर्ती, धन, आपले म्हणण्यासारखा मूढ नाहीं ॥ विषय वासने सारखे महान भयंकर सर्प वगैरे बाधक पदार्थ विषय दुसरें नाहींत ॥ अविचारासारखा दुसरा रवरवीत नर्क नाहीं ॥ समदृष्टी सारखी महत्प्राप्ती नाहीं ॥ मत्सरा सारखा घात नाहीं ॥ विवेका सारखें ऐश्वर्य नाहीं ॥ अंतरात चारी वाचेसह रामनाम जाणविणाऱ्या सारखा साधु नाहीं ॥ विदेही होऊन स्वस्वरूप पहाणाऱ्या सारखा योगी नाहीं ॥ देहाचा भरवसा व सुख मानणे यासारखी भूल नाहीं ॥ अभिमानासाखी हानी नाहीं ॥ आत्मज्ञानासारखी श्रीमंती नाहीं ॥ परमार्थास विक्षेप येईल त्यासारखें नुकसान नाहीं ॥ सुकृतास परनिंदे सारखी हानी नाहीं ॥ अनुभव पाहिल्याशिवाय बरें अथवा वाईट म्हणणें वृथा आहे ॥ भ्रमास भुलणे यासारखा अविचार नाहीं ॥ आपला दुर्गुण न ओळखणाऱ्यासारखा मूर्ख अधम नाहीं ॥ मन जिंकण्यासारखा राजा नाहीं ॥ तळमळ सोडून रहाणाऱ्यासारखा सुखी नाही ॥ नम्रतेसारखे साधन नाहीं ॥ अंतर शुद्धीसारखे तीर्थ नाहीं ॥ लोभासारखा, अनर्थ नाहीं ॥ श्रीराम श्रीसद्गुरुनाथ यांच्या वांचून शरण कोणास न जाणारा यासारखा विदेही नाहीं ॥

–ज्ञानोपदेश